फक्त सभासदांसाठी
वर्ष ४४वे, अंक १०वा * एप्रिल२०२६

सभा : मंगळवारी संध्या. ६.३० वा.
रूईया मूक बधिर शाळेचे सभागृह,
स.प.महाविद्यालय प्रांगण (मागची बाजू)

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

* अध्यक्ष *
अरविंद भडकमकर
मो. ९८३३८६९६५२

* संपादक *
अविनाश जोशी
मो.९९२२००८४९६

### पदग्रहण समारंभ संपन्न

स्नेहसेवाचा ४६ वा पदग्रहण समारंभ मंगळवार, दि. ७ एप्रिल, २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. पदग्रहण समारंभाचे विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेवक आणि 'आपलं घर' संस्थेचे संस्थापक श्री. विजय फळणीकर आणि अध्यक्षस्थानी स्नेहसेवाचे ज्येष्ठ सभासद श्री. मोहन गुजराथी व्यासपीठावर होते. तसेच, व्यासपीठावर स्नेहसेवाच्या अध्यक्षा डॉ. राधाताई संगमनेरकर, सचिव नीलाताई सरपोतदार, स्नेहसेवाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. अरविंद भडकमकर आणि सचिव प्रा. रवींद्र कोठावदे होते. स्नेहसेवाचे सदस्य बहुसंख्येने पदग्रहण समारंभास उपस्थित होते.

स्नेहसेवाच्या प्रथेनुसार, समारंभाच्या प्रारंभी सामूहिक प्रार्थना गायन झाले. स्नेहसेवाचे सदस्य कै. बबनराव साठे यांची ही रचना आहे.

सलग दुसऱ्या वर्षी सुद्धा, ज्यांनी स्नेहसेवाच्या अध्यक्षपदाची धुरा आपल्या समर्थ नेतृत्वाने आणि समर्पण भावनेने यशस्वीपणे सांभाळली आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला, अशा अध्यक्षा डॉ. राधाताई संगमनेरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वर्षभर सक्रिय सहकार्य करणाऱ्या सभासदांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त करीत, वर्षभरातील विविधांगी कार्यक्रम आणि उपक्रम यांचा आढावा घेतला.

अध्यक्षा डॉ. राधाताई संगमनेरकर यांना सचिव या नात्याने, उत्तम पद्धतीने साथ दिली ती नीलाताई सरपोतदार यांनी. डॉ. नीलिमाताई भडभडे यांनी मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी ट्रस्ट, तसेच, आयकर विभाग, यांचा पाठपुरावा गेली तीन वर्ष सातत्याने केला. त्यांचे सल्ले आणि मार्गदर्शन स्नेहसेवाला आणि ट्रस्टला नेहमीच उपयोगी ठरलेले आहेत, याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.

वर्षभर स्नेहसेवात भरगच्च कार्यक्रम झालेत. ज्ञान आणि मनोरंजन यांची सांगड घालणारे काही कार्यक्रम झालेत. यथाशक्ती, समाजासाठी, समाजातील वंचित घटकांसाठी मदत करणारे, सीमेचे रक्षण करणाऱ्या सैन्य दलासाठी उपयुक्त असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये बहुसंख्य सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात, समारंभाचे अध्यक्ष आणि प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

यानंतर नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ संपन्न झाला. नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. अरविंद भडकमकर यांचा उज्ज्वलाताई नाईक यांनी परिचय करुन दिला. अन्य पदाधिकाऱ्यांचा परिचय अध्यक्ष श्री. अरविंद भडकमकर यांनी करुन दिला. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सैनिकांसाठी विशेष उपक्रम, दुर्बल घटकांना मदत करणे, गरजूंना शैक्षणिक मदत देणे, वृद्धांना मदत करणे, गरजूंच्या प्राथमिकता पूर्ण करणे, याला प्राधान्य दिले जाईल. सभासदांनी सुद्धा नवनवीन प्रकल्प सुचवावेत, असे विचार त्यांनी आपल्या मनोगतात मांडले.

पदग्रहण समारंभाचे विशेष अतिथी श्री. विजय फळणीकर यांचा परिचय प्रा. रवींद्र कोठावदे यांनी करुन दिला. श्री. फळणीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात ते असे म्हणाले की, उपेक्षितांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. दुःखाला उगाळत बसण्यापेक्षा जगण्याचा आनंद घ्यावा. म्हणूनच आमचे कौटुंबिक दुःख बाजूला सारुन, आपलं घर हा उपक्रम सुरु केला. या उपक्रमांतर्गत आत्तापर्यंत ८४ कोटी रुपयांचे प्रकल्प उभे करु शकलो. रुग्णालयात अत्याधुनिक इक्विपमेंट्स आहेत. विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया रुग्णालयात होतात. रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना अवघ्या १० रुपयात उत्कृष्ट पोटभर भोजन दिले जाते. दानशूर लोकांमुळेच हा प्रकल्प आम्ही चालवू शकतो. हा संपूर्ण उपक्रम कोणत्याही शासकीय मदतीशिवाय चालवण्यात येतो. समाजसेवेच्या नावाखाली लोक अनेक उद्योग करत असतात. समाजसेवा करताना समाजाचा विश्वास संपादन करणे गरजेचे असते. संस्थाचालकांना कोणत्याही प्रकारचा माज असता कामा नये. कुणालाही दुखावू नकोस, हा वडिलांनी दिलेला मूलमंत्र मी पाळतो. म्हणूनच आपलं घरसारखा उपक्रम चालवू शकलो.

स्नेहसेवाचे ज्येष्ठ सदस्य आणि मार्गदर्शक, प्रबोध संस्थेचे संचालक, थोर उद्योगपती आणि समाजभान असणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेले, पदग्रहण समारंभाचे अध्यक्ष मा. श्री. मोहन गुजराथी यांचा सत्कार डॉ. मुकुंद संगमनेरकर यांनी केला आणि आपले मनोगत व्यक्त केले.

पदग्रहण समारंभाचे अध्यक्ष, मा. श्री. मोहन गुजराथी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते आपल्या मनोगतात म्हणाले की, प्रेक्षागृहात किमान २०-२५ माजी अध्यक्ष आहेत. जुन्या सदस्यांची मांदियाळी आज उपस्थित आहे. स्नेहसेवामध्ये सत्ताकांक्षा न ठेवता, सभासद योगदान देतात. सध्या एकमेकांच्या घरी येणं-जाणं कमी झालं आहे. त्यात वाढ होऊन स्नेहवर्धन होईल असे पहावे. आठवड्यातून किमान दोन-तीनजणांना फोन करा. आपल्याला झेपतील असे सेवाभावी प्रकल्प चार सभासदांनी एकत्रित येऊन करावेत. स्नेहसेवातील सदस्यांचे सरासरी वय कमी व्हावे. संस्थेच्या जीवनात चढ-उतार होतात. सगळ्यांनीच जाऊ दे हे तत्व अंगीकारावे. माझ्या आनंदासाठी मी हे केलं पाहिजे - स्वांत सुखाय! स्वार्थ सुखाय नको! कोणतीही अपेक्षा नको, म्हणजे अपेक्षाभंगाचे दुःख नको. स्नेहसेवाच्या प्रार्थनेतील उल्लेखाप्रमाणे, उत्साह कार्यी असू दे. मी नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा देतो.

सुधाताई जावडेकर यांनी आभार प्रदर्शन केले आणि या जगन्नाथाच्या रथाला सर्वांनीच हातभार लावावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

पदग्रहण समारंभाचे सूत्र संचालन प्रा. रवींद्र कोठावदे यांनी केले.

सुग्रास भोजनाने पदग्रहण समारंभाची सांगता झाली.

**प्रा. रवींद्र कोठावदे**

## तुळशीबाग राम मंदिर भेट

दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी स्नेहसेवा संस्थेची नूतन वर्षातील प्रथम संस्था भेट तुळशीबाग राम मंदिर भेटीने संपन्न झाली.

श्री रामदास तुळशीबागवाले, ट्रस्टी, यांनी माहिती दिली.

तुळशीबाग हे पुण्यातील प्रसिद्ध आणि ऐतिहासिक ठिकाण आहे. येथील भव्य राम मंदिर नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी बांधले. येथे पूर्वी श्रीमंत खाजगीवाले यांची तुळशीची बाग होती.

नारो आप्पाजी यांचे पेशव्यांशी घनिष्ठ संबंध होते. सन १७६१ मध्ये नारो अप्पांजी यांनी राम मंदिराची स्थापना केली. एकूण खर्च रुपये १,३६,६६७/- एवढा झाला. त्यावेळेस सोने रुपये १५ प्रति तोळा असे होते. राम, लक्ष्मण व सीता यांच्या संगमरवरी मूर्ती प्रेक्षणीय आहेत. श्रीरामासमोर प्रसिद्ध काळया पाषाणातील दास मारुतीची मूर्ती पाथरवट गुजराती यांनी घडविली. तुळशीबाग मंदिराचे आवार एकूण एक एकर आहे . सभा मंडप २० फूट उंचीचा असून लांबी ६० फूट व रुंदी ४० फूट आहे. अशा ऐतिहासिक मंडपात बसून तुळशीबाग वाले यांच्याकडून या मंदिराचा इतिहास ऐकण्याचे भाग्य स्नेहसेवेच्या सदस्यांना लाभले.

मंदिर परिसरातील गणपती, दत्त, विठ्ठल रुक्मिणी, महादेव मारुती व शेषशाई ही मंदिरे आहेत.

येथील मुख्य उत्सव म्हणजे रामनवमीचा असतो .त्यानंतर एक महिन्यांनी दुपारी साडेबारा वाजता सीतामाई जन्माष्टमीचाही उत्सव असतो ही बाब लक्षणीय आहे.

प्रारंभी प्राचार्य श्याम भुर्के यांनी रामनामाचे महत्त्व विशद केले. पंचमहाभूतांची प्रार्थना केल्याने प्रभू रामचंद्र यांना कसे यश प्राप्त झाले हे सांगितले. डॉक्टर प्रदीप वाघ लिखित सीता शक्ती या ग्रंथाचे प्रकाशन याच वेळेस झाले. तेंव्हा चित्रा वाघ, सुधाकर जोशी हेही उपस्थित होते. श्री अरविंद भडकमकर-अध्यक्ष, स्नेहसेवा, यांचे हस्ते रामदास तुळशीबागवाले यांना प्राचार्य श्याम भुरके लिखित नामदार जगन्नाथ शंकर शेट चरित्र भेट दिले. प्राध्यापक श्री रवींद्र कोठावदे यांनी आभार प्रदर्शन केले.

सौ गीता भुर्के यांनी समर्थ रामदास रचित कल्याणकरी रामराया हे गीत गायले.

सौ. अंजली भाटवडेकर यांनी मटार करंजी आणि थंड पेयाची सुरेख व्यवस्था करून सदस्यांना खुश केले. सदस्यांनी तुळशीबागेत फेरफटका मारून अधिकचा आनंद लुटला.

**प्राचार्य श्याम भुर्के**

## मिरासदारी

सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री.द.मा. मिरासदार यांच्यावर आधारीत 'मिरासदारी' हा कार्यक्रम प्रा. श्याम भुर्के व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. गीता भुर्के यांनी मिळून सादर केला. कार्यक्रमास द.मा.मिरासदार यांच्या कन्या सौ. सुनेत्रा मंकणी उपस्थित होत्या.

१४ एप्रिल १९२७ रोजी ेलापूर जिल्ह्यातील अकलूज जवळील एकजून या गावी श्री. द.मा.मिरासदार यांचा जन्म झाला. पण ते लवकरच पंढरपूर येथे राहावयास आले. त्यांचे वडील वकील होते. वकीलांकडे सल्ला घेण्यास आलेल्या अशिलांच्या भांडणातून द.मा.मिरासदार यांना अनेक कथांचे बीज सापडले. त्याकाळी बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने 'मम सुखाची ठेव' या कार्यक्रमाचे सादरीकरण मिरासदार यांनी केले.नंतर सुनंदा यांच्याबरोबर ते विवाहबद्ध झाले. 'लग्नाची बेडी'मध्ये त्यांनी काम केले खरे, पण त्यामुळेच त्यांना नोकरीतून संस्थेने काढून टाकले. पुढे ते औरंगाबाद येथील देवगिरी कॉलेजमध्ये ते नोकरीस लागले. पण त्यानंतर

लवकरच ते पुणे येथे गरवारे कॉलेजमध्ये रुजू झाले.

प्रा. शंकर पाटील, श्री व्यंकटेश माडगुळकर यांच्याबरोबर त्यांनी महाराष्ट्रभर कथाकथनाचे कार्यक्रम केले. गर्दी जमवायची असेल तर मिरादार हवेतच असे समीकरणच झाले होते. अल्प बचत योजना, फॅमिली प्लॅनिंग सारख्या कार्यक्रमांसाठीसुद्धा त्यांचा सहभाग मोलाचा होता. 'माझी पहिला चोरी' ही त्यांची कथा खूप गाजली होती. सौ. गीता भुर्के यांनी या कथेचे सादरीकरण उत्कृष्ट केले.

विनोद करणे ही वृत्ती आहे व निर्मळ स्वभावाची व्यक्तीच चांगला विनोद करू शकते असे मिरासदार यांचे मत होते. विनोद हे माणसाला मिळालेले वरदान आहे असे ते म्हणायचे. ही विनोदाची परंपरा पुढे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चिं.वि.जोशी, आचार्य अत्रे यांनी चालू ठेवली.

**श्री. बळवंत काळभोर**

## कमांडो राम शिंदे यांचे अनुभव कथन

दि. २१ एप्रिल २०२६, कमांडो राम शिंदे यांचा जन्म इंदापूर या शिवनेरीजवळील गावी झाला. वडील कीर्तनकार होते. त्यातील संस्काराने आपण मोठे व्हायचे हे त्यांनी ठरवले. खूप अभ्यास केला. पुणे विद्यापीठातून एम.ए.झाले. कामराज विद्यापीठातून एम.एसस्सी. झाले आणि एम.बी.ए.ही झाले. पी.एच.डी साठी ---- विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

त्यांनी संरक्षण दलात जायचे ठरवले. त्यासाठी नियमित व्यायाम केला. सैनिक दलातील खडतर तपश्चर्या करीत शिक्षण घेतले. व्यायामातील अडथळ्यांची शर्यत पार केली. ते शाकाहारी आहेत. त्यांची मुलाखत संरक्षणमंत्री राजनाथ यांनीही घेतली.

त्यांनी २४ वर्षे इंटेलिजन्स सर्व्हिसेसमध्ये काम केले. १२ वर्षे कमांडो म्हणून कार्यरत होते. त्यातील अनेक अनुभव त्यांनी स्नेहसेवामध्ये 'सैनिक जीवनावर बोलू काहीट या विषयावर बोलताना सांगितले. विशिष्ट महत्त्वपूर्ण कारवाई करण्यास ऑपरेशन म्हणतात. अशी ११ ऑपरेशन्स त्यांनी यशस्वी केली. रशियातील मोहिमेत ७० किलो वजन पाठीवर घेऊन ५ कि.मी. चालावे लागले.

त्यांना उत्कृष्ट सेवेसाठी अनेक पुरस्कार मिळाले. ओव्हरऑल बेस्ट कमांडंट, शूटिंग चॅम्पियनशिप गोल्ड मेडल, बेस्ट एन सी.ओ. गोल्ड मेडल, रशिया, बेस्ट कमांडो, दिल्ली हे त्यातील काही पुरस्कार होत. आता त्यांनी जवानांना साहाय्य करण्यासाठी 'हम है ना' ही समाजसेवी संस्था स्थापन केली आहे.

त्यांची ओळख सौ. रिताराणी शितोळे यांनी प्रभावीपणे करून दिली. त्यांचा सत्कार स्नेहसेवा अध्यक्ष अरविंद भडकमकर यांचे हस्ते झाला. प्रा. रवीन्द्र कोठावदे यांनी प्रास्ताविक केले. प्रायार्य श्याम भेर्के यांनी आभार प्रदर्शन केले. सैनिक स्नेहच्या वातावरणात वाढलेले श्रोते या व्याख्यानाने भारावून गेले.

**प्राचार्य श्याम भुर्के**